शामुको.– वाय ५३ (६ पा. × २५ संच = १ पु. × १०,००० पु.)-५.२००९

Form : I-A

# FIRST INFORMATION REPORT

पहिली खबर

(Under Section 154 Cr. P. C.)

(फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये)

No. 148353

1. *Dist. : ठाणे *P.S. [illegible] *Year २०१८ *FIR No. ३१/१८ *Date १२/०२/१८
   जिल्हा पोलीस ठाणे वर्ष पहिली खबर क्र. तारीख

2. (i) *Act : लाचलुचपत प्रतिबंध *Sections : ७ (अ) प्रमाणे.
   अधिनियम कलमे

   (ii) *Act : अधिनियम १९८८ चे *Sections :
   अधिनियम कलमे

   (iii) *Act : सुधारणा २०१८ चे *Sections :
   अधिनियम कलमे

   (iv) *Other Acts & Sections :
   इतर अधिनियम व कलमे

3. (a) *Occurrence of Offence : *Day : *Date From : ०८/०२/१८ *Date To : ०८/०२/१८
   अपराधाची घटना वार तारीख पासून तारीख पर्यंत

   *Time Period : *Time From : *Time To : ०८ : ००
   वेळेचा अवधी पासून पर्यंत

   (b) Information received at P. S. Date : १२/०२/१८ *Time : ०० : ४५
   पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याची तारीख वेळ

   (c) General Diary Reference Entry No. (s) : ०२ *Time : ०० : ४५
   सर्वसाधारण रोजनिशीचा संदर्भ क्र. वेळ

4. Type of Information : *Written / Oral : लेखी
   माहितीचा प्रकार लेखी / तोंडी

5. Place of Occurrence : (a) *Direction and Distance from P. S : *Beat No. :
   घटनेचे ठिकाण पोलीस ठाणे पासून दिशा व अंतर गस्तक्षेत्र क्र.

   (b) *Address : मर्फी, आर.टी.ओ. कार्यालय, ठाणे.
   पत्ता

   (c) In case outside limit of this Police Station, then the
   या पोलीस ठाण्याच्या हद्दीच्या बाहेर असल्यास, त्या पोलीस ठाण्याचे नांव

   Name of P. S. : Dist. :
   पोलीस ठाणे जिल्हा

6. Complainant / Informant :
   तक्रारदार / खबरी

   (a) Name : अजयकुमार विजयबहादुर सरोज.
   नांव

   (b) Father's / Husband's Name : विजयबहादुर सरोज.
   पित्याचे / पतीचे नांव

   (c) Date / Year of Birth : (d) Nationality भारतीय.
   जन्म तारीख / वर्ष राष्ट्रीयत्व

   (e) Passport No. : Date of Issue : Place of Issue :
   पारपत्र क्र. दिल्याची तारीख दिल्याचे ठिकाण

   (f) Occupation : शिक्षण
   व्यवसाय

   (g) Address : बी. एम. एस. नॅशनल कॉलेज, बांद्रा रा 0/20, गल्ली नं ११, मोतीनगर, राधास्वामी रोड, विजय पान लॉन्ड्री के पास, [illegible], पश्चिम.
   पत्ता

Scanned by CamScanner

Form : 1-B

No. 148353

Details of Known / suspected / unknown accused with full particulars :
माहित असलेल्या / संशयीत / माहित नसलेल्या आरोपीचा संपूर्ण तपशील :
(Attach separate sheet if necessary)
(आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा)

समीर तानाजी जाधव वय 26 वर्षे, रा. रुम नं 6, रोड नं-3,
वागळे इस्टेट, ठाणे.

sical features, deformities and other details of the suspect :
ीतांची शारीरिक ठेवण, व्यंग आणि इतर तपशील :

| ;ex नग | *Date/Year of Birth जन्मतारीख / वर्ष | *Build बांधा | *Height in Cms. उंची (सें.मी. मध्ये) | *Complexion वर्ण | *Identification Mark(s) ओळख |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

| Deformities/Peculiarities व्यंग/वैशिष्ट्ये | *Teeth दात | *Hair केस | *Eye डोळे | *Habit (s) सवयी | *Dress Habits पोशाखाच्या सवयी |
|---|---|---|---|---|---|
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | | | | |

| *Languages/Dialect भाषा / बोली भाषा | PLACE OF | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | *Burn Mark भाजल्याची खूण | *Leucoderma कोड | *Mole तीळ | *Scar व्रण | *Tattoo गोंदण |
| 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| | | | | | |

hese fields will be entered only if Complainant/Informant gives any one or more particulars about the suspect. his will be used only for the purpose of preliminary retrieval to assist I. O.
र तक्रारदार / खबरीने संशयीत बद्दल वरील १ किंवा अधिक रकान्यातील माहिती दिली तरच भरावी. तपास अधिकाऱ्याने प्राथमिक पातळीवर तपास रण्यासाठी वरील माहिती उपयोगात आणावी.

A database created will subsequently link one suspect in several cases, if any.
ा अनुषंगाने तयार झालेल्या माहितीचा उपयोग संशयीताचा इतर गुन्ह्यांतील सहभाग स्पष्ट करेल.

A comprehensive and complete data on all fields will again be prepared when any accused is arrested irrespective of previous suspicion.

Scanned by CamScanner

Form : 1-C

No. 148353

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant :
तक्रारदाराने / खबऱ्याने तक्रार करण्यातील विलंबाची कारणे :

तात्काळ

Particulars of properties stolen / involved (Attach separate sheet if necessary) :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :

*Total value of properties stolen / involved :
चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य :

*Inquest Report / U. D. Case No., if any :
मरणान्वेषण अहवाल / यु. डी. प्रकरण क्र., जर असल्यास :

F. I. R. Contents (Attach separate sheets, if required) :
पहिल्या खबरीतील हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावेत) :

तो. मे. कोर्ट व प्राप्त यांनील फिर्यादीचा दिनांक ०८/०२/१९ रोजी १२.५८ वा. पर्यंत. दिलेला तक्रारीवरुन करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आर.टी.ओ. कार्यालय मार्फत येथे अशासकीय खाजगी इसम नामे समिर नानाजी जाधव वय २६, रा. रुम नं ८, रोड नं. ३, वा.ई. ठाणे याने फिर्यादीचे लर्निंग व पक्के लायसन्स काम शासकीय काम आरटीओकडून करुन देण्यासाठी त्यांच्या नावाने आरोपीने २५००/रु लाचेची मागणी केली. त्याप्रमाणे दि. ११/०२/१९ रोजी मार्फत आर.टी.ओ. कार्यालयाच्या बाहेर सर्विस रोडवर २५००/- रु लाचेची रक्कम स्विकारली असताना १२:५८ वा. रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून

Action taken : Since the above report reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No.2, registered the case and took up the investigation/directed* .................... Rank .................... to take up the investigation/Refused investigation/transferred to P. S. .................... on point of jurisdiction.

केलेली कार्यवाही : बाब क्र. २ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये अपराध घडल्याचे वरील अहवालावरून दिसून आल्यामुळे प्रकरण नोंदवले आणि तपासाचे काम हाती घेतले पोलीस निरिक्षक लक्ष्मण राठोड
पदनाम .................... यांना तपासाचे काम हाती घेण्याचा निर्देश दिला / तपास करण्याचे नाकारले / अधिकारितेच्या मुद्यावर .................... पोलीस ठाण्याकडे हस्तांतरीत केले.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/Informant free of cost.
पहिली खबर तक्रारदाराला / खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदवली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला / खबरीला प्रत मोफत दिली.

Signature/Thumb impression of the Complainant/Informant.
तक्रारदाराची / खबरीची सही / अंगठ्याचा ठसा

Signature of the Office-in-charge, Police Station
पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याची सही

*Name : डी. पी. राठोड
नांव

*Rank : पो. हवा No. : 6202.
पदनाम क्रमांक

15. Date & Time of despatch to the court :
कोर्टात पाठविल्याची तारीख व वेळ

Scanned by CamScanner

# फिर्याद

दिनांक ११/०२/२०१९

श्री. संजयकुमार विजयबहादूर सरोज, वय २१ वर्षे, व्यवसाय–शिक्षण (बी.एम.एम., नॅशनल कॉलेज, ब्रांदा राह.डी/२८, गल्ली नंबर ११, भोलानगर, राधास्वामी रोड, विजय पवार लॉन्ड्री के पास, भाईदर पश्चिम

मी वर नमूद केल्याप्रमाणे असून नमूद ठिकाणी माझे कुटुंबासोबत वास्तव्यास आहे. मी शिक्षण घेत असून आमचा लॉन्ड्रीचा व्यवसाय असून त्यापासुन मिळणाऱ्या उत्पन्नावर आमचे कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो.

मी नॅशनल कॉलेज, बांद्रा, मुंबई येथे एस.वाय.बी.एम.एम चे शिक्षण घेत आहे. माझे टु व्हिलरचे लर्निग लायसेन्स मिळणेकरीता दिनांक ०८/०२/२०१९ रोजी सकाळी ०९:०० वाजता मर्फी, आरटीओ कार्यालय, ठाणे येथे ऑनलाईन अर्ज केला होता. त्यासोबत जन्मदाखला आणि आधारकार्ड स्कॅन करून जोडून शासकीय फि २००/– रु. ऑनलाईन भरले होते. त्याबाबत मला पोहच पावती मिळाली. त्या पावतीवर दिनांक ०५/०३/२०१९ रोजी टेस्टसाठी हजर राहणेबाबत मला कळविण्यात आले होते. परंतु मी व माझा मित्र श्री. कृष्णा गुप्ता असे मर्फी आरटीओ कार्यालय, ठाणे येथे लायसन्स काढण्याची प्रक्रिया माहीत करून घेण्यासाठी गेलो. त्यावेळी मला मर्फी आरटीओ ठाणे येथे लर्निग लायसन्सबाबत काहीएक माहीती मिळाली नाही. त्यावेळी मला तेथे समजले की, मर्फी आरटीओ कार्यालयात कोणतेच काम हे खाजगी इसम (एजंट) शिवाय होत नाही. याबाबतची माहीती मला व माझा मित्र श्री. कृष्णा गुप्ता यांना मिळाली. तेव्हा आम्ही मर्फी आरटीओ कार्यालयाचे बाहेर हजर असलेल्या खाजगी इसम (एजंट) यांच्याकडे जावून लर्निग लायसेन्स काढून देणेबाबत बोलणी केली असता, त्यांनी स्वत:साठी तसेच आरटीओ कार्यालयातील अधिकाऱ्यांसाठी अडीच ते तीन हजार रूपये लाचेची मागणी करू लागले. मला आरटीओ कार्यालयाचे बाहेर बसणाऱ्या एकही खाजगी इसमाचे (एजंटचे) नाव माहीती नाही तसेच मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी मर्फी आरटीओ कार्यालयाचे बाहेर बसणाऱ्या खाजगी इसमाविरूध्द (एजंटविरूध्द) आणि आरटीओ कार्यालयातील अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करण्यासाठी अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे येथे दिनांक ०८/०२/२०१८ रोजी हिंदीतून लेखी टंकलिखीत तक्रार दिली आहे.

पो.नि. राठोड यांनी माझे तक्रारीचे अनुषगांने दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करणे आवश्यक आहे असे सांगुन ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृह, ठाणे येथील दोन शासकीय पंचाना त्यांच्या कार्यालयात बोलावले. पो.नि. राठोड यांनी माझी त्या दोन्ही पंचांची ओळख करुन दिली व माझी तक्रार पंचाना दाखविली. सदरची तक्रार पंचानी वाचून त्यावर सहया केल्या तसेच पो.नि. राठोड यांनी समक्ष सही करून सदरची तक्रार आपल्या ताब्यात घेतली.

मी दिलेल्या लेखी तक्रारीची पडताळणी करण्याकरीता दिनांक ०८/०२/२०१९ रोजी मी, माझा मित्र श्री. कृष्णा गुप्ता, पंच व पडताळणी/सापळा पथकासह अॅन्टी करप्शन ब्युरो, ठाणे कार्यालयातुन निघुन साईधाम स्नॅक्स हॉटेलच्या समोरील सर्व्हिस रोडवर याठिकाणी पोहचलो. त्यानंतर पो.नि. राठोड यांनी पंचाशी चर्चा करून मी व माझा मित्र श्री. कृष्णा गुप्ता व पंच नंबर १ तिवाटणे यांचेसह पडताळणी कारवाईकामी मर्फी आरटीओ कार्यालयाजवळ भाडोत्री रिक्षाने पाठविण्याचा निर्णय घेतला. आरटीओ कार्यालयाचे बाहेर बसणारे खाजगी इसम (एजंट) यांची भेट घेण्याकरिता जाण्यापूर्वी माझे शर्टच्या छुपा कॅमेऱ्यांचे डिव्हाईस मी चालू केले तसेच पो.नि. राठोड यांनी पोना पोटे यांना बनियनमध्ये डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करण्यास सांगितले. त्याप्रमाणे पोना पोटे यांनी माझे बनियनमध्ये शासकीय डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करुन बनियनमध्ये ठेवण्यात आला. त्यानंतर मी, माझा मित्र श्री. कृष्णा गुप्ता व पंच नंबर १ श्री. तिवाटणे असे मर्फी आरटीओ कार्यालय, ठाणे येथे जावून खाजगी इसम (एजंट) यांची भेट घेतली असता त्यापैकी पहिल्या खाजगी इसमास (एजंटला) जावून भेटलो व त्यांना मी ऑनलाईन

Scanned by CamScanner

फॉर्म भरला असल्याचे सांगून मला नोकरी करीता अर्जट लायसेन्स पाहीजे असे सांगितले त्यावेळी मला सांगितले की, **ऑनलाईन भरा तो डेट मॅगता है, ना आगे का, अभी मार्च चालू है. ..., अपॉईमेन्ट नंबर दिया क्या, डेट कोनसा ओ, स्लॉट स्लॉट ....,** त्यानंतर मी त्यांना पाच तारीख मिळालेली आहे असे सांगताच त्यांनी मला सांगितले की, **नही.. इसमे कुछ नही होगा...** असे सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांच्याकडून निघून पुढे दुसऱ्या खाजगी इसमाकडे (एजंटकडे) गेलो व त्याला देखील मी लर्निंग लायसेन्ससाठी ऑनलाईन फार्म भरला असल्याचे सांगितले असता त्यांनी मला सांगितले की, **हा...ऑनलाईन है..ना.., पाच तारीखेला यावं लागेल, कुठली पाच मार्च, तेव्हाच यावं लागेल, ऑनलाईनची डेट असते, त्या डेटला यावे लागते, काहीच नाही होवू शकत** असे सांगितले. त्यानंतर आम्ही त्यांचेकडून निघून पुढे एका ओमनी कारमध्ये बसलेल्या तिसऱ्या खाजगी इसमाकडे (एजंटकडे) गेलो असता त्यांना सांगितले की, लर्निंग लायसेन्ससाठी ऑनलाईन फॉर्म भरला असल्याचे सांगून लवकरात लवकर मला लायसन्स पाहिजे असल्याचे सांगितले असता त्यांनी सांगितले की, **अभी निकल गया है... पुरा दिन..., वो एक दिन मे तेरा कर देगा.. उसके बाद एक महीना के बाद जो ट्राय है ना.... उसका डेट मिलेगा टेस्ट के लिए उसपे वो लर्निंग लायसन्स पे गाडी चला सकता है., अमाऊन्ट बारासौ रूपये...., एक्झाम बिक्झाम कुछ नही..., वो टेस्ट आएगा, एक महीने बाद.. वो टेस्ट के लिए आपको जाना पडेगा.., परमन्ट टोटल.. अभी जो उसका जो डेट आना है.. वो टाईम को लेके जाना..., पुरा करके चाहीए क्या मेरे से..., अढाई हजार दे दो..., मराठी नही.. मगर ट्रायल को आऐगा ना.. एक्झाम को अंदर भी नही. आर.टी.ओ. अधिकाऱ्याकडे जायची आवश्यकता नाही** असे सांगितले.

माझेकडे लर्निंग लायसेन्स काढून देणेकामी १२००/—रु तसेच लर्निंग व पक्के लायसेन्स असे दोन्ही काढून देण्यासाठी तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) ने २५००/—रु (दोन हजार पाचशे रूपये ) ची लाचेची मागणी केली. त्यावेळी मी त्यांना सोमवारी घेवून येतो असे सांगितले. त्यावर तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) यांनी सोमवारी लाचेची रक्कम मर्फी आरटीओ कार्यालय,बाहेर सर्व्हिस रोड, ठाणे येथे घेवून येण्यास सांगितले. त्यानंतर मी पंचासह तेथुन निघुन पो.नि. राठोड व पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो असता पो.नि. राठोड यांनी माझ्या शर्टाच्या आत बनियनला लावण्यात आलेल्या डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून ताब्यात घेतला. तसेच माझेकडील असलेला छुपा कॅमेरा मी बंद केला.

सदर डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण पोलीस वाहनामध्ये पो.नि. राठोड तसेच पंचांनी ऐकले असता, लर्निंग लायसेन्स काढून देणेकामी १२००/—रु तसेच लर्निंग व पक्के लायसेन्स असे दोन्ही काढून देण्यासाठी तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) ने २५००/—रु (दोन हजार पाचशे रूपये ) ची लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दिनांक ११/०२/२०१८ रोजी मी सापळा कारवाईमध्ये लाच म्हणुन देण्याकरीता लागणारी माझ्याकडील बचतीमधील रूपये २५००/— ची रक्कम (रु. २,०००/— दराच्या एकुण १ व रूपये ५००/— एकूण १ चलनी नोटा) आणून पो.नि. राठोड यांना दिली. पो.नि. राठोड यांनी पथकातील एका कर्मचाऱ्याकडून त्या नोटांच्या झेरॉक्स प्रती काढून घेतल्या. पो.नि. राठोड यांच्या सुचनेनुसार पोलीस वाहनाचे चालक पोना श्री. महाले यांनी मला व पंचाना अॅन्थ्रॅसीन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगितले व त्यानंतर चालक पोना श्री. महाले यांनी मी दिलेल्या रु. २,०००/— दराच्या एकुण १ व रूपये ५००/— एकूण १ चलनी नोटांना पो.नि. श्री. राठोड यांचे कक्षात अॅन्थ्रॉसीन पावडर लावली आणि माझ्या शर्टच्या डाव्या बाजूच्या खिशात अलगद ठेवल्या.

त्यानंतर पो.नि. राठोड यांनी मला सुचना दिल्या की, तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) ने लाचेची मागणी केल्यांनतरच मी माझ्या शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशातील लाचेची रक्कम डाव्या

Scanned by CamScanner

...ातुन काढून तिसऱ्या खाजगी इसमास (एजंट) दयावी. तसेच तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर डाव्या हाताची बाही वर करून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा दयावा असे सांगितले व पो.नि. राठोड यांनी पोना पोटे यांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून बनियनमध्ये ठेवण्यास सांगितले. पो.नि श्री. राठोड यांचे सुचनेप्रमाणे पोना पोटे यांनी माझे डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून बनियनमध्ये लावले. तसेच माझे शर्टाच्या आतील छुपा कॅमेरा मी चालू केला. त्यानंतर मी व माझा मित्र श्री. कृष्ण गुप्ता, पंच नंबर १ श्री. तिवाटणे व सापळा पथकासह मर्फी आरटीओ कार्यालय, ठाणे येथे गेलो. मर्फी आरटीओ कार्यालय बाहेर येथे तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) यांची भेट घेतली. तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) यांनी माझ्याशी माझ्या लर्निंग व पक्के लायसेन्स चर्चा करून लाचेच्या रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, **अडाई...अडाई, नही, तुम बोलतो ना... हजार पण ले रिस्क असे? एक्झाम दे, वो दे? मी ते हजार रूपयामध्ये पण करून देवू शकतो? पण तुझी रिक्स ,एक्झाम दे.., लगेच.... अर्धा तासात..., हा.... हा... ते सर्व करून घेतो** त्याप्रमाणे मी लाचेची रक्कम माझे उजव्या हाताने शर्टाच्या डाव्या बाजुच्या खिशातुन काढुन तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) यांच्या समोर धरली असता ती त्यांनी त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांनी त्यांच्या बॅगेच्या वरील चैन मधील कप्प्यात ठेवली. त्यावेळी दोन्ही पंच व सापळा पथकातील अंमलदार मर्फी आरटीओ कार्यालयाच्या बाहेर उभे होते.

तिसऱ्या खाजगी इसमाने (एजंट) यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर मी पुर्वनियोजित इशारा म्हणुन माझ्या डाव्या हाताची बाही वर करून लाच स्विकारल्याचा पुर्वनियोजित इशारा दिला असता जवळंच असलेल्या पो.नि. राठोड व पोहवा कोळी यांनी तिसऱ्या खाजगी इसम (एजंट) यांचे दोन्ही हात पकडले. त्यानंतर तिसरा खाजगी इसम (एजंट) यांना पो.नि. राठोड व पोहवा कोळी यांनी स्वत:ची ओळख करुन देवुन त्यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पो.नि. राठोड यांनी दोन्ही पंचासमक्ष तिसऱ्या खाजगी इसम (एजंट) यांचे नाव, पत्ता व लाचेच्या रक्कम कुठे ठेवली याबाबत विचारणा केली असता त्यांनी त्यांचे नाव समीर तानाजी जाधव, वय २६ वर्षे, राह. रूम नंबर ८, रोड नंबर ३, वागळेइस्टेट, रोड नंबर १९, ठाणे असे सांगून नमुद लाचेची रक्कम ही त्यांनी बॅगेच्या वरील चैन मधील कप्प्यात ठेवली असल्याचे सांगितले व पंचासमक्ष खिशातुन रक्कम काढुन ती पंचांनी ताब्यात घेतली.

त्यानंतर सापळा कारवाईत लाचेच्या रक्कमे व्यतिरिक्त खालीलप्रमाणे वस्तु जप्त करण्यात आले आहे.

| वर्णन | अंदाजीत किंमत |
|---|---|
| १) ओमनी कार नंबर एमएच०४–एएक्स–६३६७ | २५०००/–रु |
| २) डेल कंपनीचा लॅपटॉप | ३००००/–रु |
| ३) एच.पी लेझरजेट कंपनीचा प्रिन्टर/झेरॉक्स | |
| [illegible] | [illegible] |
| ४) ल्युमिनस कंपनीचा इन्वर्टर/बॅटरी | १५०००/–रु |
| एकूण | ८५०००/–रु |

त्यानंतर पो.नि. राठोड यांचे सुचनेनुसार पुढील सापळा कारवाई मर्फी आरटीओ कार्यालय, ठाणे येथील मिटीग हॉल येथे सुरू करण्यात आली.

आरोपी खाजगी इसम समीर तानाजी जाधव यांच्याशी माझे कोणतेही पूर्ववैमनस्य नाही किंवा माझे त्यांचेशी कोणत्याही प्रकारचे आर्थिक देण्या–घेण्याचे व्यवहार नाहीत. तसेच आरोपी

Scanned by CamScanner

खाजगी इसम समीर तानाजी जाधव यांना देण्याकरीता आणलेली लाचेची रक्कम ही मी माझे वैयक्तीक बचतीतुन आणलेली आहे.

एकंदरीत माझे तक्रारीनुसार करण्यात आलेल्या पडताळणी व सापळा कारवाईमध्ये असे निष्पन्न होते की, यातील आरोपी खाजगी इसम समीर तानाजी जाधव, वय २६ वर्षे, राह. रूम नंबर ८, रोड नंबर ३, वागळेइस्टेट, रोड नंबर १९, ठाणे हे मर्फी आरटीओ कार्यालय,बाहेर सर्व्हिस रोडवर, ठाणे या शासकीय कार्यालयातील कामकाजाच्या संबंधाने एजंट म्हणून काम करतात. माझे लर्निंग व पक्का लायसन्स मर्फी आरटीओ कार्यालय, ठाणे कडे असल्याने त्यांचे काम करण्यासाठी आरोपीत खाजगी इसम श्री. समीर तानाजी जाधव हे करीत असलेल्या कामामुळे स्वत:चा आर्थिक फायदा करून घेण्यासाठी मर्फी आरटीओ कार्यालयातील लोकसेवकांवर प्रभाव असल्याचे दर्शविले. माझे लर्निंग व पक्के लायसन्सचे काम करून देण्यासाठी दिनांक ०८/०२/२०१९ रोजी २५००/–रु. लाचेची मागणी त्याप्रमाणे दिनांक ११/०२/२०१९ रोजी मर्फी आरटीओ कार्यालयांच्या बाहेर सर्व्हिस रोडवर २५००/–रु. लाचेची रक्कम स्विकारली असतांना १२:५८ वाजता रंगेहाथ पकडण्यात आले. म्हणून माझी त्यांचे विरोधात कायदेशीर फिर्याद असुन कारवाई होणेस विनंती आहे.

माझी फिर्याद मराठीत संगणकीकृत करुन ती मला हिंदीतुन समजावुन सांगितली. ती मी सांगितल्या प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अमलदार
वागळे इस्टेट पोलीस स्टेशन
ठाणे

Scanned by CamScanner